जनसंपर्क कक्ष
02 JUL 2023
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या इमारतीचे भूमीपूजन



कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या स्वतंत्र इमारतीच्या भूमीपूजन प्रसंगी कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठामधील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या स्वतंत्र इमारतीचे भूमीपूजन शुक्रवारी कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर या इमारतीच्या बांधकामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली.

विद्यापीठाच्या स्वनिधीतून होत असलेल्या या इमारतीसाठी ६ कोटी ३८ लाख ५८ हजार रुपये खर्च येणार आहे. इमारतीच्या कामाचे वास्तुविशारद विशाल पाटील (पुणे) असून याचा ठेका शिवप्रसाद कन्स्ट्रक्शनला देण्यात आलेला आहे. सदरचे बांधकाम हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने देण्यात आली.

यावेळी प्र–कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, डॉ. आण्णासाहेब गुरव, डॉ. दीपा इंगवले, उपकुलसचिव रमेश लिधडे, उपकुलसचिव रणजीत यादव, अमित कांबळे, डॉ. गिरीष कुलकर्णी, रमेश पोवार, सदानंद सबनीस, साबांखाचे श्याम कुंभार, कार्यकारी अभियंता एस. आर. पाटील, ठेकेदार अमर जाधव आदी उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात वसंतराव नाईक जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : माजी मुख्यमंत्री व राज्याच्या कृषिक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती शनिवारी शिवाजी विद्यापीठात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास केंद्राचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. तानाजी चौगुले, उपकुलसचिव डॉ. जी. आर. पळसे, डॉ. प्रियांका जाधव, शिवानी पाटील उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठात क्रीडाविषयक पदवी अभ्यासक्रम सुरू

## राज्यात पदवी स्तरावर प्रथमच सुविधा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून बी.ए. (स्पोर्ट्स) हा क्रीडाविषयक नवीन त्रैवार्षिक पदवीस्तरीय अभ्यासक्रम सुरू करण्यात येत असल्याची माहिती विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी शनिवारी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत स्पोर्ट्स (क्रीडा) या विषयातील पदवीस्तरीय अभ्यासक्रम सुरू करण्याच्या प्रस्तावाला मान्यता प्राप्त झाली आहे. क्रीडा क्षेत्रामध्येच व्यावसायिक कारकीर्द घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बारावीनंतर लगेचच हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. पदवीच्या शिक्षणानंतर बी.पी.एड., एम.पी.एड. अभ्यासक्रम यापूर्वी उपलब्ध असले तरी राज्यात पदवी स्तरावर प्रथमच अशा स्वरूपाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केला आहे.

या अभ्यासक्रमामध्ये शारीरिक शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाबरोबरच संगणक, सामाजिक मूल्यशिक्षण, संज्ञापन कौशल्य, शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडा पत्रकारिता, क्रीडा मानसशास्त्र, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक शिक्षण, आहार व पोषण, योग आणि ध्यानधारणा, पर्यावरणशास्त्र, आधुनिक क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा व्यवस्थापन या विषयांसह क्रीडाविषयक व्यापक प्रात्यक्षिक ज्ञानाचा समावेश आहे.



### कुठे मिळतील संधी?

या अभ्यासक्रमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणामधील पुढील अभ्यास आणि संशोधन करण्याच्या संधी तर आहेतच; त्याशिवाय क्रीडा प्रशिक्षण, योग, शारीरिक तंदुरुस्ती, फिजिओथेरपी तसेच आहार, आदी क्षेत्रांमध्येदेखील नोकरी आणि व्यवसायाच्या संधी आहेत.

02 JUL 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तीन स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त दर्जा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या तीन स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्यात आला आहे. या महाविद्यालयांना विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित पदवी प्रदान करता येऊ शकणार आहे.

यामध्ये दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट (इचलकरंजी), विवेकानंद महाविद्यालय



(कोल्हापूर) आणि राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (साखराळे, जि. सांगली) यांचा समावेश आहे.

या महाविद्यालयांना विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित पदवी प्रदान करण्याबरोबरच नवीन प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करणे अधिक सुलभ होणार आहे. तसेच विद्यापीठाच्या मंजुरीने पीएच.डी.चे अभ्यासक्रम सुरू करणे, अभ्यासक्रमांची शुल्क रचना निर्धारित करणे अशा अनुषंगिक बाबींसाठीचे स्वातंत्र्य मिळणार आहे. स्वायत्त महाविद्यालयांत सुरू असलेल्या अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नामाभिधानाप्रमाणे अभ्यासक्रमांची नावे बदलणे, मूल्यांकनाची पद्धत निश्चित करणे, निकाल जाहीर करणे, गुणपत्रके बहाल करण्याची परवानगी मिळणार आहे.

शिवाजी विद्यापीठाने २३ मे २०२३ रोजी परिपत्रक काढून स्वायत्त महाविद्यालयांकडून अधिकारप्रदत्त दर्जासाठी अर्ज मागवले होते. विद्यापीठास प्राप्त झालेल्या एकूण पाच अर्जांची रितसर दुबार छाननी करून एकूण तीन स्वायत्त महाविद्यालयांचे अर्ज पात्र करण्यात आले. सर्व पात्र अर्ज विद्या परिषदेच्या शिफारशीने व्यवस्थापन परिषदेने मान्य केले आहेत.

पुढारी

# विद्यापीठात क्रीडाविषयक पदवीस्तरीय अभ्यासक्रम सुरू

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठात चालू शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून बी.ए. (स्पोर्टस्) हा क्रीडाविषयक नवीन त्रैवार्षिक पदवीस्तरीय अभ्यासक्रम चालू करण्यात येत आहे, अशी माहिती विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली. अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाबरोबरच संगणक, सामाजिक मूल्यशिक्षण, संज्ञापन कौशल्य, शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडा पत्रकारिता, क्रीडा मानसशास्त्र, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक शिक्षण, आहार व पोषण, योगा व ध्यानधारणा, पर्यावरणशास्त्र, आधुनिक क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा व्यवस्थापन या विषयांसह क्रीडाविषयक व्यापक प्रात्यक्षिक ज्ञानाचा समावेश आहे.

पुढारी

# गुणपडताळणी, फोटोकॉपीसाठी विद्यापीठाची नवीन कार्यप्रणाली

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून मार्च-एप्रिल २०२३ परीक्षेच्या संगणक कार्यप्रणालीमधून ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांची फोटोकॉपी मागणी, फेरतपासणी अर्जाचे शुल्क ऑनलाईन भरण्याची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज व शुल्क भरल्यानंतर सदरचे अर्ज जमा करण्यासाठी विद्यापीठामध्ये यावे लागणार नाही अथवा पोस्टाने पाठवावे लागणार नाही. विद्यार्थ्यांनी केलेल्या अर्जाबाबतची कार्यवाही, सद्य:स्थिती स्वत:च्या लॉगिनमध्ये दिसेल. यासाठी विद्यार्थ्यांनी आपले लॉगिन नियमितपणे पाहणे आवश्यक आहे. सदरची संगणक प्रणाली विद्यापीठाच्या आय.टी. सेल यांनी स्वत: विकसित केलेली आहे. या सुविधांचा लाभ सर्व संबंधितांनी घ्यावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठ भरारी पथकाकडून सहा गैरप्रकारांची नोंद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या आजअखेर १८९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून ६ गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रसाद समितीतर्फे करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजित जाधव यांनी दिली.

पुण्यनगरी

# वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात

कोल्हापूर : माजी मुख्यमंत्री व राज्याच्या कृषिक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विधी अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास केंद्राचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. तानाजी चौगुले, उपकुलसचिव डॉ. जी. आर. पळसे, सहायक प्राध्यापक डॉ. प्रियांका जाधव, विधी अधिविभाग, शिवानी पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
02 JUL 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तीन स्वायत्त महाविद्यालयांना 'अधिकारप्रदत्त' दर्जा

## शैक्षणिक स्वायत्ततेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल

विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार विद्यापीठाशी संलग्नित तीन स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्यात येत आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार स्वायत्ततेकडे विद्यापीठाने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल ठरेल.

– डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या तीन स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा दिला आहे. यामध्ये दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट (इचलकरंजी), विवेकानंद महाविद्यालय (कोल्हापूर) आणि राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (साखराळे, जि. सांगली) यांचा समावेश आहे.

अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांना विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित पदवी प्रदान करण्याबरोबरच नवीन प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करणे सुलभ होणार आहे. पीएच.डी.चे अभ्यासक्रम सुरू करणे, शुल्क रचना निर्धारित करणे आदींसाठी स्वातंत्र्य मिळणार आहे. अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणे, मूल्यांकनाची पद्धत निश्चित करणे, निकाल जाहीर करणे, गुणपत्रके बहाल करण्याची मुभा मिळेल.

विद्यापीठाने २३ मे रोजी परिपत्रक अधिकारप्रदत्त दर्जासाठी अर्ज मागवले होते. त्यामध्ये आलेल्या पाच अर्जांची



रीतसर दुबार छाननी करून तीन स्वायत्त महाविद्यालयांचे अर्ज पात्र करण्यात आले. सर्व पात्र अर्ज विद्या परिषदेच्या शिफारशीने व्यवस्थापन परिषदेने मान्य केले.

पुण्यनगरी

# क्रीडाविषयक पदवी अभ्यासक्रम सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात या वर्षापासून बी.ए. (स्पोर्टस्) हा क्रीडाविषयक नवीन त्रैवार्षिक पदवीस्तरीय अभ्यासक्रम सुरू केल्याची माहिती विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली. या अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षणाबरोबरच संगणक, सामाजिक मूल्यशिक्षण, संज्ञापन कौशल्य, शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडा पत्रकारिता, क्रीडा मानसशास्त्र, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक शिक्षण, आहार व पोषण, क्रीडा व्यवस्थापन यासह व्यापक प्रात्यक्षिक ज्ञानाचा समावेश आहे. यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा आणि तज्ज्ञ शिक्षकही आहेत.

सकाळ

# विद्यापीठाच्या तीन स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त दर्जा

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या तीन स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्यात आला आहे. या महाविद्यालयांना विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित पदवी प्रदान करता येणार आहे.

विद्यापरिषदेच्या शिफारशींवरून व्यवस्थापन परिषदेने हा दर्जा दिला आहे. दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे टेक्स्टाईल अ‍ॅण्ड इंजिनिअरींग इन्स्टिट्यूट (इचलकरंजी), विवेकानंद महाविद्यालय (कोल्हापूर) आणि राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (साखराळे, जि. सांगली) या महाविद्यालयांच्याचा त्यामध्ये समावेश आहे. स्वायत्त महाविद्यालयांना विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित पदवी प्रदान करण्याबरोबरच नवीन प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे अधिक सुलभ होणार आहे. त्याचबरोबर विद्यापीठाच्या मंजुरीने पीएचडीचे अभ्यासक्रम सुरु करणे, अभ्यासक्रमांची शुल्क रचना निर्धारित करणे अशा अनुषंगिक बाबींसाठीचे स्वातंत्र्य मिळणार आहे.

02 JUL 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडाविषयक नवीन त्रैवार्षिक पदवीस्तरीय अभ्यासक्रम

## शिवाजी विद्यापीठात यंदापासून प्रारंभ; खेळाडूंच्या करिअरला प्राधान्य

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठात यंदापासून बी. ए. (स्पोर्ट्स) हा क्रीडाविषयक नवीन त्रैवार्षिक-पदवीस्तरीय अभ्यासक्रम सुरू होत आहे. क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी त्याबाबतची माहिती दिली.

'सकाळ टुडे' मध्ये पान एकवर 'क्रीडा विद्यापीठ आमच्या हक्काचे' ही वृत्तमालिका काही दिवसांपूर्वी सुरू केली होती. त्यात विद्यापीठ स्तरावर क्रीडा क्षेत्रात करिअर करण्यासंदर्भात कोणताच अभ्यासक्रम नसल्याचे स्पष्ट केले होते. तसेच शेजारील कर्नाटकात कोणते अभ्यासक्रम सुरू झाले आहेत, त्या विषयांची माहिती दिली होती. त्या अनुषंगाने क्रीडा अधिविभागाने खेळाडूंच्या करिअरचा विचार करून हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. तसा प्रस्ताव अधिविभागाने अधिकार मंडळासमोर सादर केला होता. त्यास मान्यता मिळाली असून, अधिविभागात अभ्यासक्रम सुरू होईल. क्रीडा क्षेत्रात व्यावसायिक कारकीर्द घडवू इच्छिणाऱ्या खेळाडूंसाठी बारावीनंतर अभ्यासक्रम उपलब्ध होत आहे. पदवीच्या शिक्षणानंतर बी.पी. एड., एम.पी. एड. अभ्यासक्रम यापूर्वी उपलब्ध असले तरी राज्यात पदवीस्तरावर प्रथमच हा अभ्यासक्रम सुरू होत आहे. शारीरिक शिक्षणामधील पुढील अभ्यास व संशोधन करण्याच्या संधी तर आहेतच; त्यासह क्रीडा प्रशिक्षण, योगा, शारीरिक तंदुरुस्ती, फिजिओथेरपी, आहार इत्यादी क्षेत्रांमध्येही नोकरी व व्यवसायाच्या संधी मिळणार आहेत. आवडीचा खेळ खेळत राहण्याबरोबरच पदवी सुद्धा देणाऱ्या अभ्यासक्रमाचा इच्छुकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले आहे.



सकाळ IMPACT

**अभ्यासक्रमाचे स्वरूप कसे ?**

शारीरिक शिक्षणाच्या तत्त्वज्ञानासह संगणक, सामाजिक मूल्य शिक्षण, संज्ञापन कौशल्य, शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडा पत्रकारिता, क्रीडा मानसशास्त्र, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक शिक्षण, आहार व पोषण, योगा व ध्यानधारणा, पर्यावरणशास्त्र, आधुनिक क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा व्यवस्थापन विषयांसह क्रीडाविषयक प्रात्यक्षिक ज्ञानाचा अभ्यासक्रमात समावेश आहे.

सकाळ

# फेरतपासणी शुल्क ऑनलाईन भरण्याची सुविधा

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर उत्तरपत्रिकांची फोटोकॉपी मागणी व त्यानंतर फेरतपासणीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरून घेतले जातात. त्यासाठी विद्यार्थ्यांना समक्ष विद्यापीठामध्ये अथवा वित्त विभागाच्या पोर्टलवरून स्वतंत्ररित्या ऑनलाईन शुल्क भरावे लागत होते.

मात्र, आता अशा अर्जांचे शुल्क ऑनलाईन भरण्याची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेली आहे. या सुविधांचा लाभ सर्व संबंधितानी घ्यावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले.

02 JUL 2023

तरुण भारत


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तीन स्वायत्त महाविद्यालयांना 'अधिकारप्रदत्त' दर्जा

## विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित पदवी प्रदान करता येणार : वेळ आणि श्रम वाचणार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित तीन स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्यात आला आहे. या महाविद्यालयांना विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित पदवी प्रदान करता येऊ शकणार आहे.



**शैक्षणिक स्वायत्ततेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल**

विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार उत्कृष्टताक्षम आणि उच्चस्तरीय दर्जा प्राप्त केलेल्या, विद्यापीठाशी संलग्नित तीन स्वायत्त महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून त्यांच्या स्वायत्ततेच्या कालवधीइतका अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्यात येत आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक स्वायत्ततेकडे शिवाजी विद्यापीठाने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल ठरेल.

–डॉ. डी. टी. शिर्के (कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ)

विद्यापरिषदेच्या शिफारशींवरून व्यवस्थापन परिषदेने तीन स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान केला. यामध्ये दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट (इचलकरंजी), विवेकानंद महाविद्यालय (कोल्हापूर) आणि राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (साखराळे, जि. सांगली) यांचा समावेश आहे. या अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांना विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित पदवी प्रदान करण्याबरोबरच नवीन प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे अधिक सुलभ होणार आहे. त्याचबरोबर विद्यापीठाच्या मंजुरीने पीएच. डी.चे अभ्यासक्रम सुरु करता येतील. तसेच अभ्यासक्रमांची शुल्क रचना निर्धारित करणे अशा अनुषंगिक बाबींसाठीचे स्वातंत्र्य मिळणार आहे. स्वायत्त महाविद्यालयांत सुरु असलेल्या अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नामाभिधानप्रमाणे अभ्यासक्रमांची नावे बदलणे, मूल्यांकनाची पद्धत निश्चित करणे, निकाल जाहीर करणे, गुणपत्रके बहाल करणे यांचीही मुभा मिळणार आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२३ मध्ये नमूद अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाच्या तरतुदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनातर्फे एकरुप परिनियम २२ मे २०२३ च्या अधिसूचनेनुसार निर्गमित करण्यात आले. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने परिपत्रक काढून स्वायत्त महाविद्यालयांकडून अधिकारप्रदत्त दर्जासाठी अर्ज मागविले होते. विद्यापीठास प्राप्त झालेल्या एकूण पाच अर्जांची रितसर दुबार छाननी करून एकूण तीन स्वायत्त महाविद्यालयांचे अर्ज पात्र केले. सर्व पात्र अर्ज विद्यापरिषदेच्या शिफारशीने व्यवस्थापन परिषदेने मान्य केले.

02 JUL 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात क्रीडा पदवी अभ्यासक्रमाला मान्यता

## विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी क्रीडा विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात चालू शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून बी.ए. (स्पोर्ट्स) हा क्रीडाविषयक नवीन त्रैवार्षिक पदवीस्तरीय अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी दिली.


शिवाजी विद्यापीठातील क्रीडा अधिविभागामार्फत स्पोर्ट्स (क्रीडा) या विषयातील पदवीस्तरीय अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव विद्यापीठाच्या अधिकार मंडळासमोर सादर केला होता. या प्रस्तावाला मान्यता मिळाली असून सन २०२३-२४ पासून अधिविभागातच हा अभ्यासक्रम या वर्षापासून सुरू केला आहे. क्रीडा क्षेत्रामध्येच व्यावसायिक कारकीर्द घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बारावीनंतर लगेचच हा अभ्यासक्रम उपलब्ध होत आहे. पदवीच्या शिक्षणानंतर बी. पी. एड., एम. पी. एड. अभ्यासक्रम यापूर्वी उपलब्ध आहे.

राज्यात पदवी स्तरावर प्रथमच अशा स्वरूपाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध झालेला आहे. अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षणाच्या तत्वज्ञानाबरोबरच संगणक, सामाजिक मूल्यशिक्षण, संज्ञापन कौशल्य, शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडा पत्रकारिता, क्रीडा मानसशास्त्र, व्यक्तीमत्व विकास, सामाजिक शिक्षण, आहार व पोषण, योगा व ध्यानधारणा, पर्यावरणशास्त्र, आधुनिक क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा व्यवस्थापन या विषयांसह क्रीडाविषयक व्यापक प्रात्यक्षिक ज्ञानाचा समावेश आहे. विद्यापीठामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडासुविधा उपलब्ध असून अध्यापनासाठी तज्ज्ञ प्रशिक्षक व शिक्षकही आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना त्यांची व्यावसायिक क्रीडा कारकीर्द घडविण्याची संधी मिळेल.

### क्रीडा क्षेत्रात रोजगाराची संधी

शिवाजी विद्यापीठ सुरू करीत असलेला बी. ए. (स्पोर्ट्स) हा अभ्यासक्रम म्हणजे क्रीडा क्षेत्रात कारकीर्द घडविणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळेल. विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडापटू घडविण्याचा निर्धार केला आहे. चालू वर्षी विद्यापीठाचे सहा खेळाडू आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडले गेलेत. भविष्यात ऑलिंपिकपटू घडविण्याचा मानस आहे. त्यादृष्टीने पदवी स्तरावरील क्रीडा अभ्यासक्रम महत्वाचे ठरतील. आवडीचा खेळ खेळत राहण्याबरोबरच पदवी सुद्धा देणाऱ्या अभ्यासक्रमाचा इच्छुक क्रीडापटूंनी लाभ घ्यावा.

डॉ. डी. टी. शिर्के (कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ)



तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

# फोटोकॉपीसाठी अर्जासह शुल्क ऑनलाईन भरण्याची सुविधा

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठ परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर काही विद्यार्थी गुणपडताळणीसाठी तसेच उत्तरपत्रिकेच्या फोटोकॉपीची मागणी करतात. त्यासाठी त्यांना ऑनलाईन अर्ज भरून पेमेंट व अर्ज सबमिट करण्यासाठी विद्यापीठात यावे लागत होते. परंतू काही दिवस बंद असलेले पेमेंट गेटवे सुरू केले असून ऑलाईन अर्ज व शुल्क भरता येणार आहे. त्यामुळे शुल्क किंवा ऑनलाईन अर्जाची कॉपी सबमिट करण्यासाठी विद्यापीठात येण्याची गरज नाही, अशी माहिती विद्यापीठाच्या वतीने प्रसिध्द करण्यात आली आहे.



फोटोकॉपी किंवा फेरतपासणी अर्जाचे शुल्क संगणक कार्यप्रणालीमध्ये Online payment Gateway सुविधा कार्यान्वित केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ व खर्चही वाचणार आहे. मार्च/एप्रिल, २०२३ परीक्षेपासून विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज व शुल्क भरल्यानंतर सदरचे अर्ज जमा करण्यासाठी विद्यापीठामध्ये यावे लागणार नाही. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या लॉगईनमधून अर्ज भरावयाचा आहे. विद्यार्थ्यांनी आपले लॉगिन नियमितपणे पाहणे आवश्यक आहे. ही संगणक प्रणाली कुलगुरू व प्र–कुलगुरू यांच्या मार्गदर्शनामुळे परीक्षा विभागातील आय. टी. सेलने स्वतः विकसित केली आहे. या सुविधांचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन केले.